VOL- VI ISSUE-VIII AUGUST 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# पर्जन्याचा ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठयाच्या खर्चावर होणा-या परिणामाचा अभ्यास : २००५-०६ ते २०१५-१६ विशेष संदर्भ :- अहमदनगर जिल्हा

**डॉ. अंगद हरिभाऊ भोंडवे,**
एम.ए., बी.एड., एम.फिल., सेट, पीएच.डी.
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत,
जिल्हा- अहमदनगर

**प्रस्तावना :-**

१९९२मधील ७३ व्या घटना दुरुस्तीने 'भारतीय राज्यघटनेत ११ व्या अनुसूचीचा समावेश करण्यात आला. या अनुसूचीत २९ कामे ग्रामपंचायतींवर सोपविली आहेत. सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठें, रस्ते बांधणे, त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे, सार्वजनिक सांडपाण्यासाठी गटारे बांधणे व त्यांची दुरुस्ती, सफाई, रस्त्यावरील पूल बांधणे ही महत्वाची बांधकामविषयक कार्ये करावी लागतात. तसेच सार्वजनिक दिवाबत्तीची व्यवस्था करणे, पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपन करणे, शेतमाल साठविण्यासाठी गोदाम बांधणे, धर्मशाळा बांधणे ही कामे करावी लागतात. त्याचबरोबर लोकांमध्ये नैतिकता रुजावी व सामाजिक कल्याणासाठी वाचनालये सुरू करणे, शिक्षणाची सोय करण्यासाठी वर्गखोल्या बांधणे लोककल्याणासाठी स्वस्त भावाची दुकाने सुरू करणे, रोजगार निर्मितीसाठी गृहउदयोग व लघु उदयोग स्थापन करणे इ. कार्ये ग्रामपंचायतींना करावी लागतात.

अहमदनगर जिल्हयात एकुण १३११ ग्रामपंचायती आहेत. सर्वाधिक ग्रामपंचायती अकोला तालुक्यात (१४६) व सर्वात कमी ग्रामपंचायती राहाता तालुक्यात (५२) आहेत. अकोला तालुक्यात नगर जिल्हयातील एकूण ग्रामपंचायतीपैकी ११.१३ टक्के ग्रामपंचायती आहेत तर राहाता तालुक्यात ३.८१ टक्के ग्रामपंचायती आहेत. तालुक्यातील एकुण लोकसंख्येपैकी पारनेर तालुक्यातील ८६.८१ टक्के लोक ग्रामपंचायत क्षेत्रात रहातात व सर्वात कमी नगर तालुक्यातील ३७.६६ टक्के लोक ग्रामपंचायत क्षेत्रात रहातात.

४५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ११६० ग्रामपंचायती आहेत. म्हणजेच नगर जिल्हयातील एकूण ग्रामपंचायतीपैकी ८८.४८ टक्के ग्रामपंचायती लहान आहेत. तर ११.५१ टक्के ग्रामपंचायती मोठया आहेत. नगर जिल्हयातील एकुण लोकसंख्येपैकी ६६.७८ टक्के लोकसंख्या (२११५७२८) लहान ग्रामपंचायतीत (४५०० पेक्षा कमी) रहाते व ३३.२२ टक्के लोकसंख्या (१०५२४२३) मोठया ग्रामपंचायतीत रहाते.

ग्रामपंचायतीवर अनेक प्रकारच्या कामाची जबाबदारी आहे. त्यातील महत्वाचे काम म्हणजे गावातील लोकांना स्वच्छ पाणीपुरवठयाची व्यवस्था करणे हे आहे. अहमदनगर जिल्हा पर्जन्य छायेचा प्रदेश आहे. या जिल्हयात खूप कमी पाऊस पडतो. त्यात अनियमितता ही मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे ग्रामिण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. ती सोडविण्यासाठी ग्रामपंचायतींना पाण्याच्या टाक्या बांधणे, पाईपलाईन टाकणे, विहिरी खोदणे, कुपनलिका घेवून पाण्याचे स्त्रोत निर्माण करावे लागतात. वेळप्रसंगी टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. अलीकडच्या काळात अहमदनगर जिल्हयात काही भागात सातत्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होत आहे. त्याचा प्रत्यक्ष परिणाम ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठयावरील खर्चात होत आहे. पुढील तक्ता क्र. १ मध्ये अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतींनी २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत पाणीपुरवठयावर केलेल्या खर्च दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १**

**अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतींचा पाणी पुरवठया वरील खर्च व सरासरी पर्जन्य : २००५-०६ ते २०१५-१६**

**(आकडे लाख रु. मध्ये)**

| वर्षे | ग्रामपंचायतींचा पाणी पुरवठया वरील खर्च | ग्रामपंचायतींचा एकूण खर्च | ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठयावरील खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण | अहमदनगर जिल्हयातील सरासरी पर्जन्य (मि.मी. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २००५-०६ | ७.९५ | ७४.१४ | १०.७ | ५५१.५ |
| २००६-०७ | ८.०१ | ३४.६३ | २३.१ | ७३६.९ |
| २००७-०८ | ८.६१ | ३८८.५ | २२.२ | ५५६.५ |
| २००८-०९ | १०.३१ | ५२७.५ | १९.६ | ५७७.७ |
| २००९-१० | १२.१५ | ६२४.९ | १९.४ | ५१०.३ |
| २०१०-११ | १६.१२ | ८८.१४ | १८.३ | ७७१.३ |
| २०११-१२ | ११.४१ | १०१.७८ | ११.२ | ४८८.४ |
| २०१२-१३ | १९.६० | १२७.६९ | १५.४ | ३८३.२१ |
| २०१३-१४ | २०.८३ | ११७.५८ | १७.७ | ५९१.१३ |
| २०१४-१५ | २२.७८ | १२७.१८ | १७.९ | ३८२.११ |
| २०१५-१६ | २१.१७ | १२१.११ | १७.५ | ३६३.०० |
| **एकुण** | **१५८९८** | **९४६४०** | **१६.८** | **५३७.४५** |

**संदर्भ :-**

१) वार्षिक प्रशासन अहवाल, सन २००५-०६ ते २०१५-१६, जिल्हा परिषद अहमदनगर,ग्रामपंचायतीचे कारभारावर आधारीत वार्षिक प्रशासन अहवाल, प्रत्रक ई.

२) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन- २०१५-१६

३) https://ahmednagar.nic.in/about.../rainfall

वरील तक्यात कॉलम नं. २ मध्ये ग्रामपंचायतींचा पाणीपुरवठयावरील खर्च दर्शविला आहे. २००५-०६ ते २०१५-१६ या काळात २०१४-१५ या वर्षी ग्रामपंचायतींनी पाणीपुरवठयावर खर्च केला आहे. या वर्षी २२.७८ लाख खर्च केला आहे. तर २००५-०६ या वर्षी ७.९५ लाख रु. एवढा सर्वात कमी खर्च केला आहे.


कॉलम नं. ४ मध्ये अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या एकूण खर्चापैकी पाणीपुरवठयावर किती प्रमाणात खर्च केला आहे हे दर्शविले आहे. २००५-०६ मध्ये नगर जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या एकूण खर्चा पैकी १०.७ टक्के खर्च पाणीपुरवठयावर केला आहे तर २००६-०७ मध्ये ते प्रमाण २३.१० टक्के एवढे आहे. २०११-१२ मध्ये पाणी पुरवठयावरील खर्चाचे प्रमाण इतर वर्षांच्या तुलनेत सर्वात कमी ११.२ टक्के एवढे आहे. २०१४-१५ मध्ये ग्रामपंचायतींनी सर्वाधिक १७.९ टक्के खर्च पाणीपुरवठयावर केला आहे. २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठयावरील खर्चाचे प्रमाण वाढत आहे. या कालावधीत अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतींनी त्यांच्या एकूण खर्चाच्या सरासरी १६.८ टक्के खर्च पाणीपुरवठयावर केला आहे.

वरील तक्त्यातील कॉलम नं ५ मध्ये २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत नगर जिल्हयातील सरासरी पर्जन्यमान दर्शविले आहे. या काळात सरासरी ५३७.४५ मि.मी. एवढा पाऊस पडला आहे. २००५-०६ या वर्षी ५५१.५ मि.मी. पाऊस पडला आहे. २०१० पर्यंत पाऊस सरासरी ५१० मि.मी. ते ७.३६ मि.मी. च्या दरम्यान पडला आहे. परंतु २०१० नंतर पर्जन्यात घट होत आहे. २०१५-१६ मध्ये सरासरी ३६३ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. थोडक्यात नगर जिल्हयात पावसाचे प्रमाण घटत आहे.

**आलेख क्रमांकः- १**

**अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठयावरील खर्च व सरासरी पर्जन्य प्रवृत्ती**

**२००५-०६ ते २०१५-१६**




**संदर्भ** :- तक्ता क्र. १

वरील आलेखात अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतींचा पाणी पुरवठयावरील खर्चाची प्रवृत्ती व अहमदनगर जिल्हयातील सरासरी पर्जन्य दर्शविला आहे. पावसाचे प्रमाण जसजसे कमी होत आहे. तसतसा ग्रामपंचायतींचा पाणीपुरवठयावरील खर्च वाढत आहे हे आलेखातील दोन्ही वक्रांवरुन दिसते. २००६-०७ नंतर दोन्ही वक्रांमधील अंतर वाढत आहे. याचाच अर्थ ग्रामपंचायतींचा पाणीपुरवठयावरील खर्च व सरासरी पर्जन्यमान यांच्यात व्यस्त संबंध आहे. सरासरी पर्जन्य जास्त असताना ग्रामपंचायतींचा पाणीपुरवठयावरील खर्च कमी आहे तर सरासरी पर्जन्य कमी असताना ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठयावरील खर्चात वाढ होत आहे.

**सारांश :-**

२००५-०६ ते २०१५-१६ या काळात ग्रामंपचायतींच्या पाणीपुरवठयावरील खर्चात वाढ होत आहे. सरासरी पर्जन्यमान व ग्रामंपचायतींचा पाणी पुरवठयावरील खर्च यांच्यात व्यस्त सहसंबंध आहे.

**संदर्भ :-**

1. अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचनः २००५ ते २०१५-१६
2. पवार जे.ई. , कड व्ही.ए., यादव चंद्रशेखर (२००४) 'पंचायतराज संस्थांचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन' यशदा-पुणे
3. यमलवड गोविंद (२००१),'स्थानिक स्वराज्य संस्था' कल्पना प्रकाशन, नांदेड
4. www.maharshtra.gov.org,
5. www.financecommission.in
6. http://panchayat.gov.in
7. URL http:/lgdirctory.gov.in local Government Directory Report